


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ३२, शुक्रवार २० डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# भाव गडगडल्याने कांदा उत्पादक हवालदिल

■ निर्यातीवरील निर्यात शुल्क हटविण्याची मागणी
■ निम्म्याने भाव कोसळयाने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले




**पारनेर : प्रतिनिधी**

**दहा दिवसांपूर्वी ५ हजार ५०० रूपये दराने विकला जाणारा कांदा २ हजार ८०० रूपये दराने विकला जाऊ लागल्याने कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे. केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवरील २० टक्के निर्यात शुल्क हटविण्याची मागणी शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे.**

पारनेर तालुक्यात मोठया प्रमाणावर कांद्याचे उत्पादन घेतले जाते. यंदा कांद्याला चांगला भाव असल्याने अनेक शेतकऱ्यांनी इतर पीकांना फाटा देऊन मोठया प्रमाणावर उन्हाळी कांद्याची लागवड केली आहे. आजूनही कांदा लागवड सुरू असून आताच कांद्याचे भाव कोसळल्याने भविष्यात काय होणार याचीही चिंता कांदा उत्पादकांना आहे.

विशेषत: पारनेर तालुक्यातील कांद्याला परदेशात चांगली मागणी असते. कांदा निर्यात करणारे व्यापारी मोठया प्रमाणावर तालुक्यातील कांदा खरेदी करून तो निर्यात करतात. मात्र कांदा निर्यातीवर केंद्र सरकारने २० टक्के निर्यात शुल्क लावले असल्याने कांदा निर्यातीवर बंधने येत आहेत. हे शुल्क हटविले तर कांदा उत्पादकांना दिलासा मिळेल अशी मागणी शेतकरी वर्ग करत आहे.

अवकाळी पाउस, लहरी हवामान यामुळे कांद्यावर रोग पडल्याने त्यावर उपाययोजना करण्यासाठी शेतकरी वर्गाचा मोठया प्रमाणावर आगोदरच खर्च झालेला आहे. त्यातच उत्पादनातही घट झाल्याने शेतकरी संकटात आहे. गेल्या काही दिवसांत समाधानकारक भाव मिळत असल्याने शेतकरी वर्गाला दिलासा मिळाला होता. मात्र मोठया प्रमाणावर भाव कोसळल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

### बुधवार दि.१८ डिसेंबरचे दर

एकूण आवक ६१ हजार ३२० गोणी सरासरी दर रू २०० ते २ हजार ८०० ४ ते ५ वक्कल २ हजार ६०० ते २ हजार ८००, नंबर १ रू.२ हजार ते २ हजार ५०० , नंबर २ रू.१ हजार ६०० ते १ हजार ९००, नंबर ३, १ हजार २०० ते १ हजार ५००, नंबर ४ २०० ते १ हजार १०० गोल्टी, गोल्टा १ हजार ३०० ते १ हजार ९००

**किती दराने किती गोण्यांची विक्री ?**

रूपये २०० ते १ हजार १०० १० हजार ९४९ गोणी, रूपये १ हजार २०१ ते १ हजार ५०० १४ हजार ८२७ गोणी, रू.१ हजार ६०१ ते १ हजार ९०० २३ हजार ५३० गोणी, रूपये २ हजार १ ते २ हजार ७०० ११ हजार ९९४ गोणी, रूपये २ हजार ८०० २० गोणी.

### शुक्रवार दि. १३ चे दर

एकूण आवक ४० हजार ३३९ गोणी सरासरी दर ५०० ते ४ हजार ४ हजार ३०० ४ ते ५ वक्कल ४ हजार २०० ते ४ हजार ३००, नंबर १ रूपये ३ हजार ५०० ते ४ हजार १०० , नंबर२ २ हजार ७०० ते ३ हजार ४००, नंबर ३ १ हजार ७०० ते २ हजार ६००, नंबर ४ ५०० ते १ हजार ६००, गोल्टी, गोल्टा २ हजार ६०० ते ३ हजार ३००

**किती दराने किती गोण्यांची विक्री ?**

रूपये ५०० ते १ हजार ५०० ४ हजार २४८ गोणी, रूपये १ हजार ५०१ ते २ हजार ५०० ८ हजार ७६७ गोणी, रूपये २ हजार ५०१ ते ३ हजार ५०० १२ हजार ३५६ गोणी, रूपये ३ हजार ५०१ ते ४ हजार २०० १४ हजार ५४१ गोणी.

### बुधवार दि.११ चे दर

एकूण आवक ४६ हजार ९६७ गोणी सरासरी दर ५०० ते ५ हजार २०० ४ ते ५ वक्कल रूपये ५ हजार ते ५ हजार २००, नंबर १ ४ हजार २०० ते ४ हजार ९००, नंबर ३ १ हजार ८०० ते ३ हजार ४००, नंबर ४ ५०० ते १ हजार ७०० गोल्टी, गोल्टा ३ हजार ते ३ हजार ८००

**किती दराने किती गोण्यांची विक्री ?**

रूपये ५०० ते १ हजार ५०० ५ हजार १४ गोणी, रूपये १ हजार ५०१ ते ३ हजार ९ हजार ७६० गोणी, रूपये ३ हजार १ ते ४ हजार १७ हजार ४०० गोणी, रूपये ४ हजार १ ते ५ हजार १०० १४ हजार ७६१ गोणी, रूपये ५ हजार २०० ३२ गोणी.

### पियुष गोयल यांना भेटणार

कांद्याचे भाव कोसळल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. त्यासंदर्भात अनेक शेतकऱ्यांनी आपल्याशी संपर्क करून कांद्याच्या भावासंदर्भात शासनाकडे पाठपुरावा करण्याचे साकडे घातले आहे. कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क हटविले गेल्यास कांद्याची निर्यात वाढून भावातही वाढ होउ शकेल. त्यासाठी निर्यात शुल्क हटविण्याच्या मागणीसाठी आपण केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांची भेट घेणार आहेत. सरकारी आधारमुल्य योजनेअंतर्गत नॅशनल को ऑपरेटिव्ह कंज्युमर फेडरेशन ऑफ इंडिया मार्फत शेतकऱ्यांच्या सोयाबिनची खरेदी करण्यात आली असून दोन महिने झाले तरी त्याचे पैसे शेतक-यांच्या खात्यावर जमा झालेले नाहीत. त्यासंदर्भातही आपण मंत्री शिवराजसिंह चौहान यांची भेट घेणार आहोत.

**खा. नीलेश लंके**
लोकसभा सदस्य.

### रविवार दि. १५ चे दर

एकूण आवक ४९ हजार ८७९ गोणी, सरासरी दर रू. ५०० ते ३ हजार ७००. ४ ते ५ वक्कल ३ हजार ५०० ते ३ हजार ७००, नंबर १ रू. ३ हजार २०० ते ३ हजार ४००, नंबर २ रू. २ हजार ५०० ते ३ हजार १००, नंबर ३ रू.१ हजार ६०० ते २ हजार ४००, नंबर ३ रू.१ हजार ६०० ते २ हजार ४००, नंबर ४ रू. ५०० ते १ हजार ५००.

**किती दराने किती गोण्यांची विक्री ?**

रूपये ५०० ते १ हजार ५०० ७ हजार ८७४ गोणी, रू.१ हजार ५०१ ते २ हजार ५०० १२ हजार २८६ गोणी, रू. २ हजार ५०१ ते ३ हजार २० हजार ८४३ गोणी, रूपये ३ हजार १ ते ३ हजार ६०० ८ हजार ४७८ गोणी, रूपये ३ हजार ७०० २५ गोणी.

### रविवार दि. ८ चे दर

एकूण आवक ३६ हजार ३०६ गोणी, सरासरी दर ५०० ते ५ हजार ५०० ४ ते ५ वक्कल ५ हजार ३०० ते ५ हजार ५०० , नंबर १ ४ हजार ५०० ते ५ हजार २०० , नंबर २ ३ हजार ५०० ते ४ हजार ४००, नंबर ३ १ हजार ६०० ते ३ हजार ४००, नंबर ४ ५०० ते १ हजार ५०० गोल्टी, गोल्टा ३ हजार १०० ते ४ हजार

**किती दराने किती गोण्यांची विक्री ?**

रूपये ५०० ते १ हजार ५०० २ हजार ९५६ गोणी, १ हजार ५०१ ते ३ हजार ७ हजार २५३ गोणी, ३ हजार १ ते ४ हजार १४ हजार २९६ गोणी, ४ हजार १ ते ५ हजार ४०० ११ हजार ६५६ गोणी, रू. ५ हजार ५०० १४५ गोणी

# १४ दिवस लोटले तरी पिंपळगांवचे आवर्तन पोहचेना !

■ पिंपळगांव जोगा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाण्याची प्रतिक्षा ■ पुण्यामध्ये अडविले जातेय पाणी

**अळकुटी : प्रतिनिधी**



**पिंपळगांव जोगा धरणातून गेल्या ६ डिसेंबर रोजी आवर्तन सोडण्यात आल्यानंतर १४ दिवस लोटले तरीही हे पाणी पारनेर तालुक्याच्या हद्दीमध्ये न पोहचल्याने लाभक्षेत्रातील शेतकरी कालव्याच्या पाण्याकडे लक्ष देऊन बसले आहेत. दरम्यान, पुणे जिल्हयातच पाणी अडविले जात असल्याने पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांवर नेहमीप्रमाणेच अन्याय होत असल्याच्या शेतकऱ्यांच्या भावना आहेत.**

गुरूवारी सायंकाळपर्यंत किलोमिटर ४२ पर्यंत पाणी आलेले नव्हते. पाण्याचा वेग अत्यंत कमी असून अशा स्थितीमध्ये हे पाणी टेलपर्यंत पोहचण्यासाठी आजूनही २० दिवस लागतील. पाणी देण्याची पध्दत टेल टू हेड असताना पुणे जिल्हयात मध्येच पाणी सोडून घेतले जाते. पारनेर तालुक्यातील गावे पुर्ण होण्याआगोदरच पाठीमागे पाणी फोडून घेतले जाते.

पुणे जिल्हयात परस्पर पाणी सोडून घेण्यात आल्याने कालवा ओला आहे असे असताना पारनेर तालुक्यात पाणी पोहचण्यास इतके दिवस लागतात कसे असा प्रश्न लाभधारक शेतकऱ्यांना पडला आहे. पारनेरवर होणाऱ्या अन्यायविषयी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता आमच्याकडे कर्मचारी कमी आहेत.

### पुणे जिल्ह्याच्या हद्दीत परस्पर आवर्तन !

**या हंगामात पुणे जिल्ह्याच्या हद्दीमध्ये २० ते २२ दिवस पाणी सोडण्यात आले. मात्र त्याची कुठेही वाच्यता झालेली नाही. हे पाणी पारनेर तालुक्याला मिळूही दिले नाही. त्यासंदर्भात चर्चा सुरू झाल्याने हे पाणी सोडल्याची नोंद करण्यात आल्याची माहीती आहे.**

तुमच्या हद्दीमध्ये पाणी आल्यावर आम्ही ते तुम्हाला सोडू नसता आम्ही काय करणार असा सवाल करत पुणे जिल्हयातील पाण्याच्या पळवावळवीवर अधिकारीही हतबलता व्यक्त करत आहेत.

जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी पिंपळगांव जोगा कालव्याच्या आवर्तनाचे योग्य नियोजन करून पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना पुरेसे पाणी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी बाळासाहेब पुंडे, संतोष काटे, भगवान पावडे यांनी केली आहे.

# राम शिंदे यांची विधान परिषदेच्या सभापतीपदी एकमताने निवड

## मुख्यमंत्री फडणवीस यांनी राम शिंदेंचे केले अभिनंदन

**नागपूर : प्रतिनिधी**

**विधान परिषदेचे सभापती म्हणून अखेर भाजपचे प्रा. राम शंकर शिंदे यांची आज गुरूवारी विधान परिषदेत आवाजी मतदानाने एकमताने निवड करण्यात आली. या संदर्भात उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सभागृहात घोषणा केली.**



सभापती निवडीचा प्रस्ताव विधान परिषद सदस्य श्रीकांत शिंदे, उमा खापरे, शिवाजीराव गर्गे यांनी सभागृहात मांडला. या प्रस्तावाला सदस्या मनीषा कायंदे, अमोल मीटकरी, ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी अनुमोदन दिले. प्रा.राम शिंदे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभापतींच्या खुर्चीवर बसून पदभार सोपविला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभापती पदावर सभागृहाने एकमताने निवड केल्याबद्दल विरोधी पक्ष सदस्यांसह सर्व सदस्यांचे आभार मानले.

उर्वरीत पान ३ वर

# लाडक्या बहिणींना अधिवेशननानंतर मिळणार डिसेंबरचा हप्ता!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची सभागृहात माहिती



**नागपूर : प्रतिनिधी**

**महायुती सरकारसाठी गेमचेंजर ठरलेली लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता कधी येणार, याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सभागृहात माहिती दिली. अधिवेशन संपल्यानंतर लाडक्या बहिणींना डिसेंबरचे पैसे मिळणार असल्याचे देवेंद्र फडणवीसांनी सांगितले. तसेच निकषात बदल करण्यात आले नसल्याचे ते म्हणाले.**

जुलै महिन्यात लाडकी बहीण योजनेची सुरुवात झाली. आतापर्यंत या योजनेचे पाच हप्त्याचे पैसे लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत. विधानसभा निवडणुकीमुळे नोव्हेंबर महिन्याचे पैसे ऑक्टोबर महिन्यातच देण्यात आले होते. निवडणुकीनंतर डिसेंबरचे पैसे कधी येणार, असा प्रश्न सर्वांना पडला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत आज सभागृहात माहिती दिली. तसेच खात्यामध्ये १५०० की २१०० किती पैसे जमा होणार? योजनेचे निकष काय असतील? या सर्व प्रश्नांवर देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात उत्तरे दिली.

उर्वरीत पान ३ वर

# दिलीप वळसे पाटलांना मंत्रिपद का नाही ?

■ नवीन नेतृत्व महाराष्ट्रात तयार करायचे आहे
■ सुनील तटकरेंनी स्पष्टच सांगितले



**मुंबई : प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार करण्यात आला. मात्र, अनेक आमदार मंत्रिपद न मिळाल्याने नाराज असल्याचे देखील समोर आले आहे. तसेच अजित पवारांनी ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांना मंत्रिपद का दिले नाही म्हणून अनेकांना प्रश्न पडला होता. यावर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना तटकरे यांनी अनेक प्रश्नांची उत्तरे दिली आहेत.**

कुठलाही डाग नसलेला नेता अशी ओळख असलेले दिलीप वळसे पाटील यांना मंत्रिपद का देण्यात आले नाही, असे विचारण्यात आले असता सुनील तटकरे म्हणाले, त्यांच्या ज्येष्ठत्वाचा आदर आम्हाला सगळ्यांनाच आहे. पण शेवटी नवीन नेतृत्व जेव्हा महाराष्ट्रात तयार करायचे असते, आम्हाला

उर्वरीत पान ३ वर

# ते छगन भुजबळ यांना विचारा!

## भुजबळ यांच्या प्रश्नावर शरद पवार यांची प्रतिक्रिया

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**



**छगन भुजबळ यांना मंत्रिपद मिळालं नाही त्यामुळे ते नाराज आहेत. त्यांचं असं म्हणणं आहे की मला शरद पवारांनी सन्मान दिला. पण आता सन्मान मिळत नाही. याबाबत काय सांगाल? असं विचारलं असता शरद पवार म्हणाले, "ते सगळं तुम्ही त्यांना विचारा, मला काय माहीत?" अशी एका वाक्यात प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली आहे**

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाचा विस्तार १५ डिसेंबरला पार पडला. नागपूर येथील अधिवेनशाच्या पूर्वसंध्येला मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा पार पडला. त्यानंतर हिवाळी अधिवेशनाच्या ऐन थंडीत राजकीय गरमागरमी पाहण्यास मिळाली. कारण अनेकांना मंत्रिमंडळात स्थान मिळालं नाही. छगन भुजबळ यांची नाराजी ही सर्वाधिक असल्याचं दिसून आलं. कारण त्यांनी शक्तिप्रदर्शन करत थेट जहा नहीं चैना वहाँ नहीं रहना अशीच भूमिका घेतली. या सगळ्यावर

उर्वरीत पान ३ वर



# प्रगतीमंत्र

# संवाद कौशल्याचा करा विकास...

**संवाद साधण्याचं महत्त्व माहीत नसल्यामुळे आजच्या तरुण पिढीचा घर आणि सामाजिक क्षेत्रातील संवाद हा मर्यादित झालेला आहे. एका क्लिकवर कोणतीही गोष्ट करणं किंवा गप्पा मारणं शक्य आहे तर मग वास्तविक संवादाची गरज काय ? असा प्रश्न पडणं साहाजिक आहे. पण, एक गोष्ट लक्षात घेणं महत्त्वाचं आहे, ती म्हणजे काय बोलावं आणि कसं बोलावं ? हे माहीत नसल्यामुळे ही पिढी चर्चेची परिस्थिती टाळत असू शकते...**

महाविद्यालयीन जीवनात जरी अडथळे आले नाहीत तरी कामाच्या ठिकाणी संवाद कौशल्यांच्या अभावामुळे कठीण परिस्थितींचा सामना करावा लागू शकतो. कॉर्पोरेट जग किंवा अगदी उच्च शिक्षण घेण्यासाठी संवाद कौशल्य आवश्यक आहे. ग्रुप डिस्कशन, वैयक्तिक मुलाखत हे आजकाल बहुतांश महाविद्यालयांच्या निवड प्रक्रियेचा एक भाग असून, त्यात इतर कौशल्यांपेक्षा संवाद कौशल्यावर जास्त भर दिला जातो. कॉर्पोरेट जगात प्रवेश करण्याची पहिली पायरी म्हणजे मुलाखत आणि जर तिथे तुम्हाला संवाद साधता आला नाही तर तुमच्या निवडीची शक्यता फार कमी आहे. क्लाएंट, वरिष्ठ, ग्राहक, सहकारी यांच्याशी संपर्क साधण्यासाठी संवाद साधणं गरजेचं आहे. लक्षात घ्या, कामाच्या स्वरूपानुसार दुसऱ्यांशी संवाद कमी-अधिक प्रमाणात होऊ शकतो. पण, यामुळे संवादाचं महत्त्व कमी झालं असं नाही. तुमचं संवाद कौशल्य सुधारण्यासाठी काही टिप्स दिलेल्या आहेत, ज्या तुम्हाला या स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी आणि रोजगारक्षम बनवण्यास नक्कीच उपयुक्त ठरतील.




## काही टिप्स....


**स्वतःचं ज्ञान, वर्तमान घडामोडींबद्दल माहिती वाढवण्यासाठी विविध विषयांबद्दल वाचा. यामुळे शब्दसंग्रह तर वाढतोच. पण, त्याचप्रमाणे वाक्यरचना कशी करावी हे समजण्यास मदत होते.**

- सुरुवात घरच्यांपासून करा. तुमच्या कल्पना, विविध विषयांवरील मतं याबाबत घरच्यांसोबत चर्चा करा आणि मग हळूहळू शेजारी, नातेवाईक यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करा.
- मित्र आणि नातेवाईकांशी चॅटिंग करण्यापेक्षा व्हिडीओ कॉल करा. हे सध्याच्या कोविड-१९ परिस्थितीसाठी आहे. अन्यथा त्यांना समोरासमोर भेटा. समोरासमोर बोलण्यानं आपण किती सहजतेनं बोलू शकतो हे समजतंच. त्याचबरोबर श्रोत्याच्या प्रतिक्रिया देखील जाणून घेण्याची चांगली संधी मिळते.
- केवळ स्वतःच्या आवडीच्या नाही तर विविध विषयांवर बोलण्याचा प्रयत्न करा. समजा दुसऱ्या विषयांबाबत जास्ती माहिती नसेल तर निराश होऊ नका, माहितीसंग्रह वाढवण्यासाठी उत्सुक व्हा! दुसऱ्यांकडून नवीन शिकण्याचा प्रयत्न करा.
- लोकांशी चर्चेत सामील व्हा. स्वतःच्या बोलण्याच्या पद्धतीबाबत आत्मविश्वास निर्माण होईल. त्याचप्रमाणे योग्य शब्दांची निवड करून संवाद कसा साधावा हे देखील समजण्यास मदत होईल.
- तुम्ही बोलायला उत्सुक आणि तयार आहात असे तुमच्या वागण्यातून दाखवून द्या. यामुळे दुसऱ्यांना तुमच्याशी बोलणं सोपं जाईल. बोलताना नेहेमी समोरच्या व्यक्तीकडे बघून बोला. संभाषण सुरु ठेवण्यासाठी त्या संबंधित प्रश्न विचारा.
- सुरुवातीस संवाद साधणं हे जरी त्रासदायक किंवा कंटाळवाणं वाटलं तरीसुद्धा सहज हार मानू नका. सध्याचे जग हे वेगवान आहे आणि लोकांच्या आठवणी देखील अल्पकालीन आहे. अशा परिस्थितीमध्ये दुसऱ्यांवर छाप पाडणं अपरिहार्य आहे आणि अशी छाप पाडण्यासाठी संवादासारखे प्रभावी कौशल्य कोणतं नाही. लक्षात घ्या, आपण लहान वयात बोलायला शिकतो. पण, संवाद साधणं हे एक कौशल्य असून हे कौशल्य विकसित होण्यासाठी बराच कालावधी लागतो.



## विद्यार्थ्यांना यशाचे ११ कानमंत्र...

- कधीही फार तास सलग अभ्यासाला बसू नका. तासाभराने दहा मिनिटांचा ब्रेक हवाच.
- अभ्यासासाठी टाइमटेबल बनवा. त्याचं काटेकोरपणे पालन करण्यासाठी मित्रांना आणि घरी जाहीर करून टाका. म्हणजे ते फॉलो करण्यासाठी घरातल्यांची मदतच होईल.
- अभ्यास करणं म्हणजे घोकंपट्टी नको. संकल्पना समजून घेऊन अभ्यास केलेला चांगला.
- एखाद्या गोष्टीमुळे टाइमटेबल फॉलो झालं नसेल तर तसं नोट डाऊन करून ठेवा. ती गोष्ट, धडा, मॅथ्स नंतर करायचं आहे हे लक्षात ठेवा.
- फ्रेश वातावरण असलेल्या ठिकाणी अभ्यासाला बसा.
- वाचताना महत्त्वाची वाक्य, शब्द अधोरेखीत करून ठेवा. पुन्हा तो धडा चाळताना त्याचा उपयोग होईल. तसंच, दिवसांतला १५ मिनिटांचा वेळ उजळणीसाठी ठेवा.
- वीकेण्डला स्वतःची टेस्ट घेऊन मार्कही द्या. अभ्यास कुठपर्यंत पोचलाय हे कळेल.
- अभ्यास करताना फळं आणि पाणी थोड्या थोड्या वेळाने घेत राहा.
- दहावीला असलेल्या विद्यार्थ्यांनी सुट्टीत करिअर कौन्सिलरकडून ॲप्टिट्युड टेस्ट करून घ्यायला हवी. जेणेकरून आपला कल, क्षमता लक्षात येऊन अकरावीला शाखा निवडणं सोपं जाईल.
- बारावीला गेलेल्या विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे वळायचं असल्यास त्याची माहिती मिळवायला सुरुवात करा. अभ्यासक्रमांतले बदल याकडेही लक्ष ठेवायला हवं.
- जे विद्यार्थी ग्रॅज्युएशनला आहेत त्यांनी आपलं करिअर अधिक फोकस्ड ठेवायला हवं. पुढे शिकायचं असल्यास त्याची माहिती मिळवायला हवी. खासगी नोकरी करायची असल्यास संवाद कौशल्य वाढवायला हवं.



# कम्युनिकेशनमधून यशाकडे...



**विद्यार्थी असताना मित्रांशी आपण सगळ्यात जास्त संवाद साधतो. कारण त्यांच्याशी असलेली कम्फर्ट लेव्हल. आपण त्यांच्याशी बोलताना काही चुकलं तर ते आपल्याला हसतील याचं त्याला टेन्शन असलं तरी तो त्याचा पिअर ग्रुप असतो. त्याला त्यात होणाऱ्या चुकांची काळजी किंवा फार जास्त भीती वाटत नाही. पण हेच त्याला आपल्या शिक्षकांशी, प्रिन्सिपलशी संवाद साधायचा असेल तर अनेकदा चुका होण्याची शक्यता असते. अगदी कार्पोरेट क्षेत्रात शिरल्यानंतरही आपल्या बॉसशी बोलताना अनेकदा चुका होण्याची शक्यता असते...**

## काय करावं...

विद्यार्थ्यांनी एकमेकांशी बोलणं गरजेचं आहे. इंग्रजीला पर्याय नाही. त्यामुळे योग्य प्रकारे इंग्रजीतून संवाद साधता आला पाहिजे. अनेकदा इंटरव्ह्यूला एखाद्या चुकीमुळे ही व्यक्ती अन्य ठिकाणीही चुका करू शकते किंवा एखादी व्यक्ती आत्मविश्वासाने बोलली तर शंभर टक्के काम करू शकेल, असा विचार केला जातो. त्यामुळे आधीपासूनच तुम्ही तुमच्या संभाषणाकडे लक्ष द्यायला हवं. नुसतं इंग्रजी येत असून उपयोगाचं नाही तर ते योग्य प्रकारे वापरता आलं पाहिजे.

## संभाषण प्रभावी करण्याचे उपाय

- पॅशन : प्रोफेशन विथ पॅशन हे गरजेच असतं. तुम्हाला भाषा, संवाद साधण्याचं पॅशन असलं पाहिजे.
- वाचन : आजूबाजूला काय घडतंय, याची जाणीव होण्यासाठी ते गरजेचं आहे.
- मोटिव्हेशन : तुमचा पिअर ग्रुप म्हणजे तुम्ही ज्यांच्याशी सहज साधू शकता, अशी माणसं. तो योग्य असायला हवा. चुका झाल्या तर होऊ द्यात. त्याशिवाय सुधारणा होत नाही. अधिकाधिक बोला, तेच संभाषण प्रभावी करण्याचं योग्य साधन आहे.
- प्ले वे मेथड टू कम्युनिकेट बेटर : टीव्ही बघताना त्याला सबटाइल दिलेल्या असतात त्या वाचा. त्यामुळे तुमचं रिटन कम्युनिकेशन चांगलं आहे. दोन-चार शब्दांचा सराव रोज करा. दिवसभरातल्या संभाषणात त्याचा वापरही करा. शब्दसंग्रह तयार करा.
- ॲनलॅटिकल स्किल : तुमचं शब्द सार्मथ्य प्रभावीपणे वापरा. एखादा शब्द उच्चारल्यानंतर अनेक शब्द तुमच्या डोळ्यासमोर आलं पाहिजे. त्यातून रिसेंट अवेरनेस येऊ शकतो.
- ॲक्टिव्ह रिडिंग : कॉन्स्पेट् वाचा. पुन्हा वाचा. डिक्शनरीला मित्र बनवा. इंटरनेटचा वापर एखाद्या शब्दाचा अर्थ, नवे शब्द धुंडाळण्यासाठी करा. ते संभाषण करताना वापरला पाहिजे.

## काय करावं ?

हसतमुखाने प्रश्नांना उत्तर द्यायला हवं. प्रश्न समजला नाही तर अनेकदा तुम्ही अंदाजाने निष्कर्षावर येता, त्याऐवजी तो प्रश्न समजून घ्या. क्रॉम्प्रिहेशन्सची गरज आहे. ॲक्टीव्ह लिसनिंग- पॅसिव लिसनिंग असावं. एखाद्या प्रश्नावर लगेच उलट प्रश्न विचारण्याची वृत्ती हवी.

## संवाद साधण्यासाठी गरज असते ती...

१०० टक्के व्होकॅबलरी, व्याकरण योग्य असावं आणि उच्चार योग्य आणि स्पष्ट असावेत. अनेकदा संवाद साधताना एखादी व्यक्ती कोणत्या भागातून आली आहे, त्याची मातृभाषा कोणती आहे, त्याचाही प्रभाव दिसून येतो. शिवाय तुमची पर्सनॅलिटी ट्रेट्स काय आहेत, यावरही कम्युनिकेशन स्किल अवलंबून असतं. आता पर्सनॅलिटी ट्रेट्स म्हणजे तुम्ही इंट्रोव्हर्ट आहात की एक्स्ट्रोव्हर्ट. तुम्ही इंट्रोव्हर्ट म्हणजे अंर्तमुख असाल तर मित्रांशी संवाद साधणंही अनेकदा कठीण होतं. अशातच एखाद्या ऑथरिटी लेव्हलवरच्या व्यक्तीशी बोलायचं असेल तर ते अधिकच दबून जातात. एक्स्ट्रोव्हर्ट व्यक्ती आपल्या पिअर ग्रुपमध्ये चांगल्या प्रकारे संवाद साधू शकतात. पण ऑथरिटी लेव्हलशी संभाषण करतानाही त्याला त्रास होतोच. अनेकदा संवाद साधताना कॉण्टेट या गोष्टीचा विचार होत नाही. उदा. प्रिन्सिपलकडे जाऊन दोन दिवस सुटी हवी आहे, असं सांगायचं असेल तर आपण योग्य शब्द, वाक्यांचा वापर करायला हवा. अनेकदा औपचारिक आणि अनौपचारिक संवाद असा फरक लक्षात घेतला जात नाही. प्रिन्सिपलसमोर उभं राहिल्यावर माय नेम इज अनिल सावंत आय हॅव स्मॉल फेवर टू आस्क... अशी सुरुवात करायला हवी. तिथे अनेक बोलीभाषेतल्या शब्दांचं इंग्रजी भाषेत भाषांतर करणं चुकीचं ठरेल. अनेकदा बॉस, प्रिन्सिपलकडे गेल्यावर संवाद साधताना अनेक जण गांगरतात. जे काही सांगायला आलो तेच विसरतात. त्यांच्या मेंदूत उडालेल्या गोंधळल्यामुळे योग्य शब्दात ते संवाद साधू शकत नाही.

## हे लक्षात घ्या...

इट डझन्ट मॅटर व्हॉट इज इन यूवर बॅग, इट डझन्ट मॅटर व्हॉट यू नो, ऑल इज मॅटर वॉट यू स्पीक ॲण्ड हाऊ यू स्पीक, याचाच अर्थ असा की तुमच्याकडे काय आहे, तुम्हाला किती माहिती आहे, याहीपेक्षा महत्त्वाचं आहे ते तुम्ही काय बोलता आणि कसं. त्यामुळे आपण एकमेकांशी बोलतो हे लक्षात ठेवा. मग तो संवाद तुमच्या मित्रमंडळींमधला असला तरी तिथेही तुम्ही योग्य शब्द योग्य प्रकारे वापरले पाहिजेत. विद्यार्थ्यांनी राइट कम्युनिकेशन विथ राइट ॲटिट्यूड हा फंडा लक्षात ठेवला पाहिजे. अन्य देशाप्रमाणे आपल्या देशात कशा प्रकारचं संवाद कौशल्य असावं, याचं शिक्षण दिलं जात नाही. त्यामुळेच तुमच्याकडे जनरल नॉलेज, आजूबाजूंच्या घडामोडींबाबतचं ज्ञान आणि त्याविषयीची सजगता असायला हवी. एखाद्या प्रसंगाला सामोरं जाताना अनपेक्षित प्रश्न, समस्या आणि अडचणींना सामोरं जाण्याची आधीपासून तयारी करायला हवी. तुमची पर्सनॅलिटी, योग्य पेहराव अशा गोष्टीही महत्त्वाच्या आहेत. एखादी गोष्ट ॲथारॅटी लेव्हलच्या माणसाशी बोलायची असेल तर पुढील गोष्टी आवर्जुन करा. एखाद्या सिनिअर ऑथॉरिटी, बॉस किंवा मोठ्या व्यक्तीने तुम्हाला चहा घेण्याचा आग्रह केला तर त्याला नाही, असं म्हणताना पुढील वाक्यांचा वापर करा. नो थॅक्स, आय एम फाइन. संवाद साधताना त्यांचं म्हणणं कळलं नाही तर नुसतं आ... असं न उच्चारता, किंवा नुसतं पार्डन म्हणून नका. शिवाय कम अगेन हा शब्द चुकूनही वापरू नका. त्याऐवजी आय एम सॉरी पार्डन सर, असं म्हणा. एखाद्या सेलिब्रिटीशी बोलताना...सॉरी आय मिस्ड यू, कुड यू बी रिपीट मी, एक्यूज मी, आय म फाइन. सिस्टमॅटिक ऐकायला आली नाही, एसक्यूज नी.... आ न करता. आय म सॉरी. पारडन, म्हणू नका. आभार मानतानाही वेगवेगळ्या वाक्यांचा प्रयोग तुमचं कम्युनिकेशन स्किल प्रभावी करू शकतं. उदा : थँक्स अ लॉट, आय हायली ॲप्रिशिएट दॅट, दॅट व्हॉज वेरी काइंड ऑफ यू, इट वॉज जस्ट माय ड्यूटी, आय एम रिअली ऑनर्ड, इट व्हॉज माय प्लेजर आदी. डोण्ट मेंशन असं अजिबात म्हणून नका.

# कौशल्ये अन् युक्त्या!

**यशस्वी व्यावसायिक व्हायचं असेल, तर त्यासाठी व्यावसायिक कौशल्यांबरोबर आत्मविश्वास, जोखीम पेलण्याची तयारी आणि वाटाघाटीचं कौशल्यही हवंच. व्यवसाय सुरू करून तो यशस्वी करण्यासाठी उद्योजकाकडे बाजारपेठेच्या माहितीबरोबरच आणखी काही कौशल्यं असणं जरुरीचं असते. ही कौशल्य अनुभवातूनच जास्त आत्मसात करता येतात...**

- इंटरपर्सनल स्किल्स : व्यवसाय म्हटला की लोकांशी संबंध आलाच. त्यामुळे तुम्हाला लोकांशी संवाद साधायला आवडतो की नाही हे तपासा. तुम्ही लोकांशी कशाप्रकारे वागता यावर तुमचं यश अवलंबून असते. स्पर्धेच्या युगात कस्टमर सर्व्हिस हा तुमचा वेगळेपणा ठरू शकतो. पण पेशन्स हवाच. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ऐकून घेण्याची कला असायला हवी. संभाषण म्हणजे फक्त स्वतःचं बोलणं दुसऱ्याला ऐकवणं नव्हे. तर दुसऱ्याचं बोलणं स्वतः ऐकून घेणं असतं.
- अडचणी सोडवण्याची कला : व्यवसाय उभा करताना रोज लहान- मोठ्या अडचणी येतच असतात. पण यशस्वी व्हायचं तर या साऱ्यावर मात करायला हवी. त्यासाठी आत्मविश्वास आणि तातडीने निर्णय घेण्याची क्षमता अंगी बाणवायला हवी. तुमचे इतरांशी असलेले चांगले-वाइट संबंधही अशावेळी कामाला येतात.
- आर्थिक कौशल्य : व्यवसाय यशस्वी आहे की नाही हे अंतिमतः गल्ल्यावरच्या रकमेवरूनच मोजलं जातं. आर्थिक बाजू आधी सांभाळली पाहिजे. रोजचे व्यवहार, व्यवस्थापकीय खर्च, बेसिक अकौटिंग, टॅक्सेशन, आवश्यक सरकारी माहिती आणि ज्या व्यवसायात पडणार त्याची संपूर्ण आणि सखोल माहिती ठेवणं आवश्यक आहे. वेगवेगळे कोर्सेस, तज्ञ व्यक्ती आणि इंटरनेटवरूनही अशी माहिती मिळवता येते.
- टेक्निकल स्किल्स : कुठलाही व्यवसाय करताना त्याची पूर्ण माहिती हवीच. सुरुवातीला तशी नसली तरी नंतर नंतर अनुभवातून आणि तज्ञांकडून किंवा पुस्तक आणि इतर सोर्सेसकडून तुम्ही ती मिळवणं गरजेचंच आहे. विनामाहिती काम करत असलात तर ते तुमच्या ग्राहकासाठी आणि अंतिमतः व्यवसायासाठी फायद्याचं नाही. अपडेटेड टेक्नॉलॉजीची माहितीही ठेवायला हवी.




## सेल्स आणि मार्केटिंग

जेव्हा एखादा यशस्वी उद्योगपती त्याच्या व्यवसायासंबंधी बोलतो, तेव्हा ते आपल्याला ऐकावंसं वाटतं. कारण आपण त्या कंपनीच्या सर्वात प्रभावी सेल्समनकडून अर्थात मालकाकडून ते ऐकत असतो. तुमच्या व्यवसायाविषयक काही असे मुद्दे काढून ठेवा की ज्याचा उपयोग कोणत्याही संभाषणाद्वारे उद्योग वाढीसाठी होऊ शकतो. मार्केटिंग म्हणजे फक्त जाहिरात नव्हे, तर तुमच्या ग्राहकापर्यंत पोहचण्यासाठी आणि त्यांना तुमच्या व्यवसायाविषयक माहिती देण्यासाठी वापरलेले अनेक प्रभावी मार्ग. यासाठी ग्राहकांची व मार्केटची सखोल माहिती हवी. याचबरोबर तुमचे प्रतिस्पर्धी कोणत्या प्रकारे मार्केटिंग करतात, ते प्रभावी आहे का ? याचा अभ्यास करून त्यातील काही मार्ग आपल्या व्यवसायात वापरू शकता. पण कोणाकडेही बाजारात नक्की काय चालेल हे सांगणारी जादूची छडी नाही.



## शॉर्ट न्यूज

### मारहाण करत एकावर हत्याराने वार

■ **श्रीरामपूर :** घराची कुलुपे तोडणाऱ्यांना हटकविल्याचा राग आल्याने दोघांना मारहाण करून धारदार हत्याराने वार करण्यात आला. ही घटना श्रीरामपूर शहरात घडली. अण्णासाहेब अशोक भालेराव हे कामावरून घरी येत असताना दीपक खंडागळे व अक्षय खंडागळे हे एका बंद घराची कुलुपे तोडताना दिसले. कशालाकोणाचे नुकसान करता? कुलपे तोडू नका, असे भालेराव त्यांना म्हणाले. याचा राग धरून रात्री अण्णासाहेब भालेराव व त्याचा भाऊ सुरेश डॉ. आंबेडकर पुतळ्याजवळ उभे असताना दीपक व गणेश खंडागळे हे दोघे आले.

### चुकीच्या कॉलमुळे पोलिसांची धावपळ

■ **शिर्डी :** पोलिसांच्या ११२ या टोल फ्री क्रमांकावर फोन करून, सासऱ्याने माझ्या पत्नीला मारून टाकले आहे. मला पोलिसांची मदत हवी आहे, असे खोटे सांगून पोलिसांना मदतीसाठी बोलाविण्यात आले, प्रत्यक्षात मात्र पोलिसांनी घटनास्थळी शहानिशा केली असता, असा कुठलाही प्रकार घडला नसून, खोटी माहिती दिल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी चुकीचा कॉल करून पोलिसांना खोटी माहिती दिल्याप्रकरणी संबंधित कॉलरविरोधात लोणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### हादगाव येथे पिण्याच्या पाण्याची अजूनही टंचाई

■ **शेवगाव :** तालुक्यातील हातगाव गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीने तळ गाठल्यामुळे हादगाव येथे पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू लागली आहे. पाटबंधारे विभागाने उजव्या कालव्यामधून रब्बीसाठी सात आवर्तनाचा कार्यक्रम जाहीर केला आहे त्यामध्ये पहिले आवर्तन ५ डिसेंबरच्या आसपास सुटणे अपेक्षित होते मात्र कालवा दुरुस्तीच्या नावाखाली अजूनही आवर्तन सुटलेले नाही. त्यामुळे येथील नागरिक संकटात सापडले आहेत. ते आवर्तन कधी सुटते याची प्रतीक्षा करत आहेत

### माजी आमदार थोरात यांच्याकडून मदतीचा हात

■ **संगमनेर :** सावरगाव घुले येथील बेलसोंडा वाडीमधील मंगल सिताराम घुले यांच्या घराला लागलेल्या आगीतून त्यांचे संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले होते. या कुटुंबाला काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी तातडीने मदतीचा हात दिला. थोरात यांच्या यशोधन कार्यालयाच्या वतीने गृहउपयोगी साहित्य देण्यात आले. यावेळी प्रा. बाबा खरात, विलास घुले, अर्जुनराव घुले, माजी सरपंच बाबाजी घुले, भाऊसाहेब घुले, उपसरपंच नामदेव घुले, सिताराम घुले ग्रामसेवक जाधव आदींसह विविध कार्यकर्ते उपस्थित होते.

### श्रीगोंदा आढळगाव रस्त्यासाठी उपोषण सुरु

■ **श्रीगोंदा :** श्रीगोंदा ते आढळगाव दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गाचे काम अपूर्ण असून हे काम तातडीने सुरू करा, यासाठी आढळगाव येथील सुभान तांबोळी या तरुणाने उपोषण सुरू केले आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी भेट दिली. मात्र, त्यांनी ठोस आश्वासन न दिल्याने तांबोळी उपोषणावर ठाम राहिले आहेत. रस्त्याचा प्रश्न महत्त्वाचा असल्याने ग्रामस्थांनी या उपोषणास पाठिबा देत राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांवर प्रश्नाची सरबत्ती केली. गेल्या वर्षभरापासून या रस्त्याचे काम बंद आहे.

# तुकडेबंदी कायद्यातील सुधारणेचे अधिनियमात रूपांतर

## मंत्री विखे पाटलांनी मांडलेल्या विधेयकाला सभागृहात मंजूरी



**नागपुर : प्रतिनिधी**

**तुकडेबंदी कायद्यातील सुधारणेला अधिनियमात रुपांतरीत करण्यात आले. नागपुर हिवाळी अधिवेशनात विधानसभा आणि विधान परिषदेमध्ये ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी या संदर्भात मांडलेल्या विधेयकाला सभागृहाने एकमताने मंजुरी दिली. या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरीकांनी खरेदी केलेल्या १ गुंठा, २ गुंठे,३ गुंठे अशा क्षेत्रांचे तुकडे नियमानुकूल होण्यास मोठी मदत होईल असा विश्वास ना.विखे पाटील यांनी व्यक्त केला.**

तुकडेबंदी कायद्यातील सुधारणेला १० ऑक्टोबर २०२४ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता घेऊन मा. राज्यपाल महोदयांच्या मान्यतेने दिनांक १५/१०/२०२४ अध्यादेश प्रसिध्द करण्यात आलेला होता. या अध्यादेशाचे आज विधिमंडळाच्या मान्यतेने अधिनियमात रुपांतर झालेले आहे. सन १९४७ साली अमलात आलेल्या तुकडेबंदी कायद्यातील तरतुदी नुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रमाणभूत क्षेत्र ठरविण्यात आले होते. मात्र याप्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हस्तांतरण करण्यास कायद्याने निर्बंध आहे. यामुळे सर्वसामान्य नागरीकांच्या अडचणी मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या.

२०१७ साली करण्यात आलेल्या सुधारणे नुसार सन १९६५ ते २०१७ या कालावधीत झालेले तुकड्यांचे व्यवहार नियमित करण्यासाठी बाजार मुल्याच्या २५ टक्के रक्कम शासन जमा करणे आवश्यक होते. मात्र ही रक्कम सर्वसामान्य नागरीकांच्या आवाक्या बाहेर होती. या अडचणींमुळे नागरीकांचे आर्थिक व्यवहारही थांबले होते. ही अडचण दुर करण्यासाठी महायुती सरकारने प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राची खरेदी विक्री करुन झालेले व्यवहार नियमित करण्यासाठी २०१७ सालापर्यंत असलेली मुदत २०२४ पर्यंत वाढविण्याबाबत निर्णय करुन, २५ टक्क्याऐवजी ५ टक्के शुल्क भरुन या जमीनी नियमानुकूल करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिलेली होती.

मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार मा.राज्यपालांच्या संमतीने १५ आक्टोंबर २०२४ रोजी अध्यादेशही काढण्यात आला होता. या अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर करण्यासाठी मंत्री विखे पाटील यांनी विधान परिषद आणि विधानसभेमध्ये याबाबतचे विधेयक सादर केले. या विधेयकाला दोन्हीही सभागृहात मान्यता मिळाल्याने तुकडेबंदी कायद्यातील सुधारणेचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयाचा मोठा दिलासा राज्यातील नागरीकांना मिळणार असून, याबाबत महसूल विभागाने माजी सनदी अधिकारी उमाकांत दांगट यांच्या नेमलेल्या समितीच्या शिफारसीही यासाठी विचारात घेण्यात आल्या आहेत.

# एसटी बस थांब्यासाठी वडाळा बहिरोबा येथे रास्ता रोको

## एसटी प्रशासनाने आंदोलकांकडे पाठ फिरवल्याने संताप



**नेवासा : प्रतिनिधी**

**नगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर सर्वात जुना थांबा असलेल्या वडाळा बहिरोबा येथे अनेक एसटी बस गाड्या प्रवासी चढउतार करण्यास नकार देत असल्याच्या निषेधार्थ वडाळा बहिरोबा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. एक तास महामार्ग अडवूनही या आंदोलनाकडे एसटी प्रशासनाने पाठ फिरविल्याने त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी आंदोलकांनी केली.**

राज्य परिवहन मंडळ अस्तित्वात आल्यापासून वडाळा बहिरोबा येथे सर्व प्रकारच्या बस गाड्यांना थांबा असताना गेल्या काही वर्षांपासून चालक-वाहक मनमानीपणे प्रवासी चढउतार करण्यास टाळाटाळ करत असल्याची तक्रार काँग्रेसच्या परिवहन विभागाचे जिल्हाध्यक्ष संदीप मोटे यांनी एसटीच्या विभाग नियंत्रकांकडे करून नियमित पाठपुरावाही केला. मात्र, तरीही बस गाड्या थांबत नसल्याने बुधवारी वडाळा-खरवंडी चौकात काँग्रेस, आम आदमी पार्टी, भाजपच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह ग्रामस्थ तसेच प्रवाशांनी रास्ता रोको आंदोलन केले.

यावेळी नगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गाच्या दुतर्फा लांबच लांब वाहनांच्या रांगा लागून वाहतूक खोळंबली होती. यावेळी ग्रामस्थ व प्रवाशांनी एसटीच्या मनमानी कारभाराविरोधात संताप व्यक्त केला. पूर्वसूचना देऊन सुमारे तासभर रास्ता रोको सुरू असताना एसटीचे जबादार अधिकारी आंदोलनाकडे फिरकले नसल्याने आंदोलकांनी त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी करत शनिशिंगणापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक खगेंद्र टेंभेकर यांच्या विनंतीवरून रास्ता रोको मागे घेतला. पूर्वसूचना देऊनही त्याची दखल न घेता आंदोलनस्थळी उपस्थित राहण्यासाठी टाळाटाळ करणाऱ्या एसटीच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी आंदोलकांनी पोलिस प्रशासनाकडे केली. या मागणीच्या पूर्ततेसाठी आगामी काळात रास्ता रोको करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला.

आंदोलनात काँग्रेसचे संदीप मोटे, शोभा पातारे, अंजुम पटेल, आपचे प्रवीण तिरोडकर, भाजपचे सुनील पतंगे यांच्यासह वडाळा बहिरोबा ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच बाबासाहेब मोटे, सचिन मोटे, लक्ष्मण मोटे, प्रतीक मोटे, दादासाहेब मोटे, वडाळा सोसायटीचे अशोक मोटे, माजी सैनिक आदिनाथ नजन, अशोक गायकवाड, सुधाकर होंडे, दीपक गायकवाड, जितेंद्र पतंगे, सारंगधर मोटे, संजय पवार, संजय कासवदे, दिलीप पवार, मुनाफ सय्यद आदी सहभागी झाले होते.

रास्ता रोको दरम्यान छत्रपती संभाजीनगरवरून नगरच्या दिशेने प्रवास करणारे माजी आमदार पृथ्वीराज देशमुख यांचे वाहन रास्ता रोकोत अडकले. यावेळी पायी आंदोलनस्थळी येत त्यांनी माहिती घेतली. क्षुल्लक आणि रास्त मागणीसाठी ग्रामस्थ व प्रवाशांना प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे रस्त्यावर उतरावे लागल्याचे पाहून त्यांनी एसटी प्रशासनासह जिल्हाधिकारी तसेच जिल्हा पोलिस प्रमुखांशी संपर्क साधून नाराजी व्यक्त केली. ग्रामस्थ तसेच प्रवाशांना न्याय देण्याची मागणी केली.

# गुंडांच्या दहशतीने जगणे मुश्किल

## पोलीस अधीक्षकांकडे कारवाईची मागणी



**नगर : प्रतिनिधी**

**शहरातील रामवाडी झोपडपट्टीत घुसून दहशत पसरविणाऱ्या गुंडासह त्याच्या टोळीवर झोपडपट्टी दादा प्रतिबंधक कायदा व ॲट्रॉसिटी कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना निवेदन देण्यात आले आहे.**

यावेळी दलित महासंघाचे सुनील उमाप, सागर साठे, प्रकाश वाघमारे, विकास उडानशिवे, पप्पू पाटील, सतीश साळवे, सुरेश वैरागर, रवी साठे, विशाल उल्हारे, भास्कर जाधव, संजय परदेशी, बंटी साबळे, राकेश राजपूत, गणेश ससाणे, पप्पू पाथरे, सोमनाथ अडागळे, राहुल मंडलिक, अमोल लोखंडे, विशाल कांबळे, कांता खुडे, मोना गाडे, अलका साबळे, मंगल चांदणे, अनिता चांदणे, अंजली शेलार, वैशाली साबळे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रामवाडी झोपडपट्टीत रविवारी ता. १५ रोजी वाहनांची तोडफोड करुन दांडके व तलवारीने मारहाण केल्याप्रकरणी जाधवसह पाच जणांवर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील आरोपी कायम रामवाडीत दमदाटी करुन दशहत निर्माण करत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.


# दर्ग्याचा घुमट कोसळल्याने एका कामगाराचा मृत्यू

## एक गंभीर जखमी, मांडवे बुद्रूक येथील दुर्घटना

**संगमनेर : प्रतिनिधी**

**संगमनेर तालुक्यातील मांडवे बुद्रुक येथे चांदशावली दर्ग्याच्या घुमटाला कळस चढवण्याचे काम सुरू असताना बुधवारी दुपारी अडीच वाजता घुमटाचा स्लॅब कोसळल्याने एक जणाचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर तीन कामगार जखमी झाले. त्यात एकाची प्रकृती चिंताजनक आहे. सुभाष तुकाराम नरवड, वय २२, असे मृताचे नाव आहे, तर अनिल गोयल तिरवडल, वय २५ हा गंभीर जखमी असून त्याला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. अमोल व्यंकटी चुडामन, वय १८, बालाजी मारुती गुलवड, वय ३० असे जखमींची नावे आहेत. सर्व कामगार नांदेड जिल्ह्यातील रहिवासी आहेत.**

ठेकेदार प्रकाश धुळगंड यांनी या दर्ग्याच्या नूतनीकरणाचे कॉन्ट्रॅक्ट घेतले आहे. मात्र त्यांचा संपर्क होऊ शकला नाही. गंभीर जखमी कामगारांना येथील डॉ. प्रदीप कुटे यांच्या हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले. दरम्यान उपचार चालू असताना सुभाष तुकाराम नरवडे यांचा मृत्यू झाला. अनिल तीरवडल याची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉ. प्रदीप कुटे यांनी सांगितले.



दरम्यान, घारगाव पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला. रात्री उशिरापर्यंत या संदर्भात गुन्हा दाखल केला नव्हता. पोलिस निरीक्षक दिगंबर भदाणे यांनी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला. या गुन्ह्यात दोषींवर कारवाई केली जाईल, असे पोलिस निरीक्षक भदाणे म्हणाले. डॉ. प्रदीप कुटे, डॉ. सोनाली कुटे व त्यांची टीम जखमी कामगारांवर उपचार करत आहे. ठेकेदार प्रकाश धुळगंड यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा संपर्क होऊ शकला नाही. यापूर्वी दोन वेळेस या दर्ग्याचे बांधकाम कोसळले होते.

उद्योजक बाबासाहेब कुटे यांनी सांगितले, घुमटाला कळस बसवण्याचे काम टेक्निकल नव्हते. त्यामुळे स्लॅब कोसळला असावा.

सुरुवातीला ग्रामस्थांनी हे काम आपण पूर्ण करण्याचे सांगितले होते.२१ लाख रुपये ग्रामस्थ देणार आणि जो काही अंदाजे ६० लाख खर्च आपण वैयक्तिक करणार होतो. ग्रामस्थांनी सुरुवातीला दिलेले १७ लाख रुपये बांधकामासाठी दिले. त्याचे काम आपण केले. मात्र यात राजकारण आल्याने हे काम आपल्याला करू दिले नाही. मारुती मंदिरासाठी ७६ लाख रुपये वैयक्तिक खर्च केला. आणखी ७ लाख खर्च करणार आहे. अशी दुर्दैवी घटना घडायला नको होती, अशी खंत कुटे यांनी व्यक्त केली.

(पान १ वरून)

## राम शिंदे यांची विधान परिषदेच्या सभापतीपदी एकमताने निवड

अडीच वर्षांहून अधिक काळ रिक्त असलेल्या विधान परिषदेच्या सभापतीपदी अखेर भाजपचे राम शिंदे यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडणुकीसाठी बुधवारी अखेरच्या दिवशी महाविकास आघाडीने उमेदवार दिला नाही. शिंदे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची कालच निवड निश्चित झाली होती. आज, गुरुवारी त्यांच्या नावाची औपचारिक घोषणा करण्यात आली. विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक-निंबाळकर यांची ७ जुलै, २०२२ रोजी सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्यापासून सभापतिपद रिक्त होते. मंत्रिमंडळातील खातेवाटपाप्रमाणे महायुतीमध्ये शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपमध्ये सभापतिपदासाठी चढाओढ सुरू होती. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या नावाची सभापतिपदासाठी चर्चा होती. तसे प्रयत्नही शिंदे गटाकडून करण्यात आले. मात्र, विधान परिषदेतील भाजपचे संख्याबळ पाहता त्यांच्याकडूनच या पदावर दावा केला जाणार, हे निश्चित मानले जात होते. भाजपमध्ये राम शिंदे आणि प्रवीण दरेकर यांच्या नावांचीही चर्चा होती. तरीही भाजपमधील वरिष्ठ नेत्यांकडून शिंदे यांच्या नावाला पसंती दिली गेली. त्यानुसार बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत शिंदे यांनी विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांच्याकडे अर्ज सादर केला. तर आज त्यांच्या निवडीची एकमताने अधिकृत घोषणा झाली.

## लाडक्या बहिणींना अधिवेशननानंतर मिळणार डिसेंबरचा हप्ता!

**काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?**

आम्ही जी आश्वासने दिली आहेत, ती आम्ही पूर्ण करणार आहोत. कुणीही मनात शंका ठेऊ नये. लाडकी बहीण योजना सुरूच राहणार असल्याचे फडणवीस म्हणाले. आमची एकही योजना बंद होणार नाही, लाडकी बहीण योजना सुरूच राहणार आहे. अधिवेशन संपल्यानंतर लाडक्या बहिणींना डिसेंबरचे पैसे मिळणार आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. तसेच या योजनेच्या कोणत्याही निकषात बदल करण्यात आलेले नाहीत. ज्यांनी अर्ज केला त्या सर्वांना आपण पैसे देत आहोत, असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

१४०० कोटींची तरतूद

दरम्यान, हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी फडणवीस सरकारने एकूण ३५ हजार ७८८.४०कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या विधिमंडळात सादर केल्या होत्या. त्यात लाडकी बहीण योजनेसाठी १ हजार ४०० कोटी रुपयांच्या तरतुदीचा समावेश आहे.

लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी ही अफवा लाडकी बहीण योजनेच्या अर्जाची छाननी करून त्यातील महिलांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप विरोधकांच्याकडून केला जात आहे. मात्र, लाडकी बहिण योजनेच्या अर्जाची छाननी करण्याचा कोणताही निर्णय झालेला नसल्याचे आमदार आदिती तटकरे यांनी म्हटले.

पुढील अर्थसंकल्पापर्यंत मिळत राहणार लाभ

पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशनात महिलांना २१०० रुपयांचा लाभ देण्याचे महायुतीने कबूल केलेले आहे. त्यानुसार अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्याची घोषणा करणार असल्याचे देखील तटकरे यांनी सांगितले आहे. सध्या ज्या महिलांना लाभ मिळत आहे, तो पुढील अर्थसंकल्पापर्यंत तसाच मिळत राहणार असल्याचे आदिती तटकरे यांनी सांगितले होते.

## दिलीप वळसे पाटलांना मंत्रिपद का नाही ?

सहभागी मंत्र्यांची संख्या मर्यादित आहे. अशावेळी नवीन चेहरा आणले तर त्याचाही उपयोग पक्षाच्या बांधणीसाठी होतो. पुढे बोलताना सुनील तटकरे म्हणाले, दिलीप वळसे पाटलांचा विधिमंडळ कामकाजाचा, मंत्रीपदाचा, विधानसभा अध्यक्ष म्हणून कामकाजाचा, संघटन कौशल्याचा प्रदीर्घ अनुभव उद्याच्या काळात आम्ही नक्कीच अशा पद्धतीने उपयोग करून घेऊ की महाराष्ट्रात आगामी काळात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसची प्रभावीपणाची भूमिका राहिलेली पाहायला मिळेल. राष्ट्रीय पातळीवर सुद्धा त्यांनी काम केले आहे.

सुनील तटकरे यांना राज्यपाल बनवण्यात येणार असल्याच्या देखील राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. यावर देखील सुनील तटकरे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. सुनील तटकरे म्हणाले, ही चर्चा तथ्यहीन आहे. या संदर्भात कधीही भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाशी आमची चर्चा कधीही झालेली नाही, असे तटकरे यांनी स्पष्ट केले आहे.

## ते छगन भुजबळ यांना विचारा!

आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

मला मंत्रिपदाची हाव नाही : छगन भुजबळ

''मी आमदार होणं किंवा मंत्री होणं हे माझं काम नाही. मला मंत्रिपदाची हाव असती तर मी १६ नोव्हेंबरला राजीनामा देऊन १७ नोव्हेंबरला आलो नसतो. मी राजीनामा दिला होता पण उल्लेख केला नाही कारण मला तसे फोन सारखे येत होते. मी राजीनामा दिला होता हे मी अडीच महिन्यांनी सांगितलं. माझ्याविरोधात अर्वाच्य बोललं गेलं तेव्हा मी सांगितलं. प्रश्न फक्त मंत्रिपदाचा नाही तर अस्मितेचा आहे. एखाद्या समाजाला बरोबर घेऊन लढणारी माणसं आपल्याकडे आहेत. कुणीही दुःखात राहण्याचं कारण नाही. कभी डर न लगा मुझे फासला देखकर, मै बढता गया रास्ता देख कर, खुदही खुद नजदिक आती गयी मंजिल मेरा बुलंद हौसला देखकर'', असं छगन भुजबळ यांनी आज कार्यकर्त्यांशी बोलताना म्हटलं.

अवहेलनेचं शल्य माझ्या मनात- छगन भुजबळ

''मंत्रिपद मिळालं नाही तरीही मी रस्त्यावर आहे. अवहेलनचं शल्य मनात आहे. मी तुम्हा सगळ्यांशी चर्चा करून पुढचं पाऊल उचलणार आहे. विचारपूर्वक निर्णय घेन. मै मौसम नहीं जो पल में बदल जाऊं, मै उस पुराने जमाने का सिक्का हूँ, ऐसेही फेक न देना तुम्हारे बुरे वक्तमें'', असंही छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. दरम्यान या सगळ्याबाबतसुप्रिया सुळेयांनीही प्रतिक्रिया दिली होती.

सुप्रिया सुळे काय म्हणाल्या होत्या?

''छगन भुजबळ आमच्याबरोबर होते तेव्हा त्यांना कायमच मान देण्यात आला. शरद पवार यांच्या शेजारीच त्यांची खुर्ची असायची. आता जी काही नाराजी वगैरे आहे तो सगळा त्यांच्या पक्षाचा अंतिम निर्णय आहे.'' असं सुप्रिया सुळेंनी म्हटलं होतं. तर आता शरद पवार यांनीही याबाबत प्रतिक्रिया दिली आहे.

# आ. काशिनाथ दातेंच्या अजेंड्यावर दोन टीएमसी पाणी!

## हक्काच्या पाण्यासाठी अजित पवारांना साकडे | विधानसभेत प्रश्न उपस्थित केल्यानंतर पवारांची घेतली भेट

**नागपुर : प्रतिनिधी**

**कुकडी प्रकल्पाची निर्मिती झाली त्यावेळी पारनेर तालुक्यासाठी दोन टीमएसी पाणी राखीव ठेवण्याचा करार होउनही अद्याप तालुक्याच्या हक्काचे हे पाणी मिळू शकले नाही. हे पाणी मिळविण्यासाठी आ. काशिनाथ दाते यांनी कुकडीचे दोन टीएमसी पाणी आपल्या अजेंडयावर घेतले असून त्यासाठी त्यांनी बुधवारी विधिमंडळात आवाज उठविला, त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवारांची जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांच्यासह भेट घेउन त्यांनाही याच प्रश्नासाठी साकडे घातले.**

कान्हूरपठार येथे पार पडलेल्या परिषदेमध्ये पारनेर तालुक्याचे हक्काचे पाणी देण्याचा शब्द अजित पवार यांनी दिला होता. मात्र अद्यापही हा प्रश्न माग लागला नाही. गेल्या पंधरा वर्षांपासून याच विषयावर केवळ मंथन सुरू आहे. हा प्रश्न कायमस्वरूपी माग लावण्यासाठी आ. दाते यांनी पुढाकार घेतला असून त्यासाठीच ते या प्रश्नाचा पाठपुरावा करत आहेत.

पाण्याचा प्रश्न मार्गी लागला तर पारनेर तालुक्याची दुष्काळी तालुका अशी असलेली ओळख काही अंशी कमी होण्यास मदत होईल. पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही सुटेल त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न माग लावा असे साकडे दाते यांनी अजित पवार यांना घातले.

प्रश्नाबरोबरच सुपा एमआयडीसीमध्ये स्थानिकांना रोजगार मिळाला पाहिजे, एमआयडीसीचा विस्तार झाला पाहिजे अशी मागणी दाते यांनी अजित पवार यांच्याकडे केली. उद्योग वाढले तर रोजगारनिर्मिती होऊन त्या माध्यमातून आर्थिक सुबत्ता येईल. तरूण आर्थिक सक्षम होतील याकडे दाते यांनी लक्ष वेधले. तुमचे सर्व प्रश्न सकारात्मक भुमिका घेऊन माग लावू अशी ग्वाही अजित पवार यांनी या बैठकीदरम्यान दिली.



■ कुकडीचे हक्काचे पाणी, एमआयडीसीतील रोजगार आदी प्रश्नांसदर्भात आ. काशिनाथ दाते यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेतली.

### विविध प्रश्नांकडे वेधले लक्ष

विधानसभा सदस्य म्हणून निवड झाल्यानंतर आ. काशिनाथ दाते यांनी शासनाचे विविध प्रश्नांकडे लक्ष वेधले आहे.अजित पवार यांची भेट घेऊन कुकडी डावा कालव्याचे आवर्तन सोडण्यास भाग पाडले. दिव्यांग बांधवांचे मानधन वाढविणे, पारनेर तालुक्याचे हक्काचे दोन टीएमसी पाणी मिळावे, एमआयडीसीमध्ये रोजगार मिळावा, तेथील दहशत थांबवावी अशा मागण्या त्यांनी केल्या आहेत.

### अजित पवारांनी दिली खास वेळ !

पारनेरच्या प्रश्नांसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे वेळ मागितल्यानंतर विधिमंडळाच्या अधिवेशनाची लगबग असतानाही त्यांनी पारनेरसाठी खास वेळ दिली. विविध प्रश्नांसोबतच आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूकांबाबत सविस्तर चर्चा या बैठकीत झाली.

**प्रशांत गायकवाड**
मा. जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

# कला व नृत्याविष्काराने प्रेक्षक मंत्रमुग्ध!

## पारनेरच्या सेनापती बापट विद्यालयाचे स्नेहसंमेलन



■ सेनापती बापट विद्यालयात वार्षिक पारितोषिक समारंभ तसेच स्नेहसंमेलन युवा उद्योजक राजेश भंडारी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

**पारनेर : प्रतिनिधी**

**शहरातील सेनापती बापट विद्यालयात पार पडलेल्या स्नेहसंमेलनातील सांस्कृतीक कार्यक्रमांनी प्रेक्षकांची वाहवा मिळविली. एकाचढ एक कार्यक्रम सादर करीत विद्यार्थ्यांचे कला व नृत्याविष्कार पाहून प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. अनेकांनी ठेका धरत आपल्या भावनांना मोकळी वाट करून दिली !**

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या सेनापती बापट विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ १७ व १८ डिसेंबर रोजी चार सत्रात मोठया उत्साहात पार पडला. युवा उद्योजक राजेश भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

संस्थेच्या सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी यांनी प्रास्ताविकात विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी कार्यवाह छायाताई फिरोदिया यांना अभिप्रेत स्नेहसंमेलन आयोजित करण्यात येत असल्याचे सांगितले. उज्वल यश संपादन करण्यासाठी जिद्द आणि चिकाटी हवी असा सल्लाही त्यांनी दिला. मुख्याध्यापक संतोष कुलकर्णी यांनी शालेय प्रगतीचा आढावा घेतला.

शाळा समितीचे अनिल भंडारी, विकास कटारिया, प्रभाकर गुळवे, भिकाजी जगदाळे, डॉ. किशोर पुरकर आदी यावेळी उपस्थित होते. उद्योजक ज्ञानेश्वर सातपुते यांच्या वतीने विद्यार्थी, पालक, पाहुण्यांना सुरूची भोजन देण्यात आले.

दुसऱ्या दिवशीच्या सत्रात विज्ञान, चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होत. विद्यार्थ्यांनी शारीरीक शिक्षण प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी नगरसेवक युवराज पठारे, गणेश मगर, सहा पोलीस निरीक्षक खंडागळे हे उपस्थित होते. शिरीष साळवे यांच्या हस्ते नटराजाचे पुजन करून प्रारंभ करण्यात आला. समिती सदस्य अमित जाधव यावेळी उपस्थित होते. मुख्याध्यापक संतोष कुलकणी, शिक्षक प्रतिनिधी काकडे, विद्यार्थी प्रतिनिधी ऋषिकेश पवार, विद्याथनी प्रतिनिधी ऋतीका महांडुळे यांनी परिश्रम घेतले.

### ध्येयावर लक्ष केंद्रीत करा

आयुष्यात यशस्वी व्हाययचे असेल तर जिद्द चिकाटी बरोबरच आपल्या कामावर नितांत श्रध्दा असणे आवष्यक आहे. आयुष्यातील इच्छित ध्येय प्राप्तीसाठी आपली लक्ष ध्येयावर केंद्रीत करणे गरजेचे आहे.

**राजेश भंडारी**
युवा उद्योजक

# निरोगी, सुरक्षित जीवनासाठी सजगता हवी

## डॉ. विकास वाळुंज यांचे प्रतिपादन | श्री मुलिकादेवी महाविद्यालयात एड्स दिनानिमित्त व्याख्यान




**निघोज : प्रतिनिधी**

**एड्स बाधितांपैकी बोटावर मोजण्याइतकं आयुष्य वाढविता येते. त्यासाठी निरोगी आणि सुरक्षित जीवन जगण्यासाठी सजगता खुप महत्वपुर्ण असल्याचे प्रतिपादन पारनेर ग्रामिण रूग्णालयाचे वैद्यकिय अधिकारी डॉ. विकास वाळुंज यांनी केले.**

नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री मुलिकादेवी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने एड्स दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी डॉ. वाळुंज यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना डॉ. वाळुंज यांनी सांगितले की, एचआयव्ही एड्स आजार पुर्णपणे बरा होण्यासाठी कोणताही उपचार नाही. त्यामुळे एडसवर प्रतिबंध हाच एकमेव उपचार आहे. एडस होतो कसा आणि त्यावर उपाय योजना कशा कराव्यात ? असुरक्षित सबंध किती धोकादायक होऊ शकतात, एडस झालेल्या व्यक्तिचा मृत्यू अटळ आहे. कारण त्याला अनेक आजार होतात असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यख उपप्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. मनोहर एरंडे यांनी एडस जनजागृती किती गरजेचे आहे याविषयी विद्यार्थ्यांना संबोधित केले.

डॉ. गोरक्ष घोलप यांनी प्रास्ताविक केले. योगिता मदगे यांनी सुत्रसंचलन तर प्रा. वृषाली जगदाळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. प्रवीण जाधव, प्रा. मनीषा गाडीलकर, डॉ. पोपट पठारे, प्रा. नुतन गायकवाड, प्रा. संगिता मांडगे, प्रा. स्वाती मोरे, डॉ. दुर्गा रायकर, प्रा. अशोक कवडे, प्रा. सचिन निघुट, प्रा. अक्षय अडसूळ, प्रा. आनंद पटेकर, प्रा. निलिमा घुले, प्रा. अश्विनी सुपेकर, प्रा. नमता थोरात, प्रा. अपेक्षा लामखडे, प्रा. अमृता दौंडकर, प्रा. निकिता सुरोशे, प्रा. रूपाली गोरडे, प्रा. पुनम गंधाक्ते, प्रा. स्वाती पवार, प्रा. हर्षदा पंडीत, प्रा. सुनंदा गाडीलकर, प्रा. सुप्रिया सालके, प्रा. दीपक खामकरर, प्रा. सुरेश गाडीलकर, प्रा. प्रविण सरडे, नवनाथ घोगरे, संदीप लंके, अक्षय घेमुडद्व किशोर बाबर आदी यावेळी उपस्थित होते.

### निघोजमध्ये रॅली

उपप्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. मनोहर एरंडे याच्या मार्गदर्शनाखाली वचन पाळा आणि एडस टाळा असा नारा देत एडसच्या जनजागृतीविषयी विविध पोष्टर हाती घेत निघोजमध्ये विद्यार्थ्यांसमवेत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

# तापमानात २ अंशांनी वाढ; 3 दिवस ढगाळ हवामान

## पारा ७.४ अंशावर ; तापमानात घट होण्याची शक्यता, दोन दिवस धुके

**नगर : प्रतिनिधी**

**नगर उत्तरेत सुरू असलेल्या बर्फवृष्टीच्या पार्श्वभूमीवर गेल्या तीन दिवसांपासून अहिल्यानगरचे तापमान ५.५ अंश सेल्शियसपर्यंत घसरले होते. त्यामुळे गारठ्याने नगरकर कुडकुडले असताना, बुधवारी (१८ डिसेंबर) दोन दिवसाच्या तुलनेत तापमान २ अंशांनी वाढले. बुधवारी नगरचे तापमान ७.४ अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदवले गेले. दरम्यान, पुढचे तीन दिवस ढगाळ वातावरणाबरोबरच धुके पसरण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.**

'फेंगल' चक्रीवादळामुळे डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात ढगाळ व अवकाळी पावसामुळे थंडीचे प्रमाण कमी झाले होते. मात्र, गेल्या आठवड्यात पुन्हा थंडीत वाढ होण्यास सुरुवात झाली. रविवारी शहराचे किमान तापमान ६.४ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले. सोमवारी त्यात पुन्हा घट होऊन ५.५ इतके नीचांकी तापमान नोंदवण्यात आले. मंगळवारीदेखील ५.५ अंश तापमान कायम होते. गेल्या सहा वर्षात प्रथमच सर्वात कमी तापमानाची नोंद सोमवारी, मंगळवारी झाली. मात्र, बुधवारपासून शहराच्या तापमानात वाढ होताना ७.४ अंश सेल्सिअस



झाले होते. दरम्यान १९ ते २४ डिसेंबरदरम्यान थंडीचा कडाका काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे.

१० डिसेंबर : १२ ११ डिसेंबर: १३ १२ डिसेंबर: १४ १३ डिसेंबर: १२.०९ १४ डिसेंबर: १२ १५ डिसेंबर: ६.४ १६ डिसेंबर: ५.५ १ ७ डिसेंबर: ५.५ १८ डिसेंबर: ७.४ थंडीचा कडाका वाढल्याने सकाळी रस्त्यावरील वाहतूक कमी झाली आहे. ९ दिवसांतील किमान तापमान १९ डिसेंबर- ११, २० डिसेंबर- ११, २१ डिसेंबर- १०, २२ डिसेंबर- ११, २३ डिसेंबर- १२ व २४ डिसेंबरला १३ अंश सेल्सिअस क्रिकेट तापमान राहणार असून, कमल तापमान ३० ते ३१ अंश सेल्सिअस इतके राहणार आहे. ढगाळ हवामानामुळे रोगाचा प्रादुर्भाव रब्बी हंगामातील गहू, हरभरा पिकांसाठी वाढलेली थंडी उपयुक्त असल्याचे मानले जाते. मात्र, अचानक हवामान बदल होऊन ढगाळ वातावरणामुळे पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याचे जाणकारांनी सांगितले.

# अल्पसंख्यांकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासन सकारात्मक

## जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांची ग्वाही

**नगर : प्रतिनिधी**

**अल्पसंख्यांक समाजाच्या समस्यांविषयी शासन सकारात्मक असून त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात येत आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले. अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त ते बोलत होते.**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी प्रवीण महाजन, बाळासाहेब कोळेकर, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, उपायुक्त प्रियंका शिंदे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे, अल्पसंख्याक समाज प्रतिनिधी यश शहा, हरजितसिंग देवेंद्रसिंग वधवा, सय्यद वहाब व



सय्यद अफजल अब्दुल कादर उपस्थित होते.

जिल्हा अल्पसंख्यांक समितीची दर तीन महिन्यांतल्या पहिल्या मंगळवारी बैठक आयोजित करण्यात यावी, अशी सूचना करीत जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थित्यांच्या समस्या जाणून घेतल्या. अल्पसंख्याक समाजाच्यावतीने उपस्थित प्रतिनिधींनी अल्पसंख्यांक समाजाच्या विविध मागण्या व समस्यांबाबत मते मांडली.

# निघोजच्या पाच खेळाडूंची सुवर्णपदकावर मोहर!

## राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड | जीत कुने दो स्पर्धेत घवघवीत यश



**निघोज : प्रतिनिधी**

**नेरूळ, जिल्हा रायगड येथे महा जित कुने दो फेडरेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय जीत कुने दो स्पर्धेत निघोजच्या प्राफेशनल तायक्वोंदो अकॅडमीच्या पाच विद्यार्थ्यांनी सुवर्णपदकावर मोहर उमटविली असून पाचही खेळाडूंची शिलाँग येथे होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**

प्रोफेशनल तायक्वोंदो अकॅडमी व वर्ल्ड कुंग फू मार्शल आर्ट ऑफ इंडिया या अकॅडमीचे संस्थापक विक्रांत रणसिंग यांनी सांगितले की, मोबाईलपासून दुर राहून खऱ्या जगात येउन ऑलिंपिक, एशियाई राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होउन विद्यार्थ्यांनी नावलौकिक कमवावा. शाळेमध्ये शाळेच्या खेळांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत हा खेळ पोहचला पाहिजे अशी विविध शाळांना विनंती असेल. निघोजमधील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये सहभाग नोंदविला पाहिजे असे ते म्हणाले.

रायगड जिल्हयातील नेरळ येथे दोन दिवस ही राज्यस्तरीय स्पर्धा मोठया उत्साहात पार पडली. या स्पर्धेत चंद्रपुर, नागपुर, गोंदीया, सातारा, पुणे आदी जिल्हयांतील खेळाडूंनी आपले कसब पणाला लावले. या स्पधेत मानव अधिकार फाउंडेशनचे अधिकारी प्रमोद फुलसौंदर, श्री गेहरा, जिथ कुने दो फेडनेशचे अध्यक्ष स्वप्निल अडुरकर, जेकेडी मोहिनी माने, जेकेडी रेफ्री विक्रांत रणसिंग, जेकेडी शौकत शेख यांनी सहभाग नोंदविला.

### सुवर्णपदकाचे मानकरी !

शिलाँग येथे पार पडणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी विकर्ण विलास निघोजकर, काव्य योगेश कवाद, राजनंदीनी राजेंद्र गायखे, मैथिली किरण गायकवाड व ओमकार चंद्रकांत रणसिंग या सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांनी निवड झाली आहे.

# विधिमंडळात ग्रंथालय व वाचन संस्कृतीवर चर्चा

## नगर ग्रंथालय चळवळीकडून स्वागत

**नागपुर : प्रतिनिधी**

**नागपुरमध्ये सध्या सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान ग्रंथालय व वाचन संस्कृतीवर चर्चा घडवून आणण्यात येउन या चळवळीच्या भवितव्यासाठी विविध उपाययोजनांची मागणी करण्यात आली. त्याबद्दल नगर ग्रंथालय चळवळीकडून या चर्चेचे स्वागत करण्यात येऊन समाधान व्यक्त करण्यात आले.**

राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम सुधारणा विधेयकावर चर्चा करताना अनेक अमदारांनी ग्रंथालयांच्या सद्य स्थितीवर प्रकाशझोत टाकल्याने तसेच सभागृहात सार्वजनिक ग्रंथालये व वाचन चळवळीवर सविस्तर चर्चा घडवून आणणाऱ्या एकनाथ खडसे, अभिजीत वंजारी, अरूण लाड, सचिन आहिर, ज.मो. अभ्यंकर या आमदारांप्रती नगर जिल्हा ग्रंथालय संघाने कृतज्ञता व्यक्त केली.

ज्यांनी शंभर वर्षे ग्रंथालयांची संस्कृती जोपासली, त्यांचा सन्मान करण्यात यावा तसेच ग्रंथालयांतील पुस्तकांसाठी अनुदान देण्यात यावे. ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांचे तुटपुंजे असलेले वेतन वाढवावे, शासकीय दराने पुस्तके उपलब्ध करून द्यावेत, प्रत्येक सार्वजनिक वाचनालयास संविधान उपलब्ध करून द्यावे अशा मागण्या यावेळी सभागृहात करण्यात आल्या.

जिल्हा संघाचे संस्थापक सदाशिव शेळके, विद्यमान अध्यक्ष सुरेंद्र शिंदे तसेच विश्वस्त मंडळाने चर्चेत सहभागी लोकप्रतिनिधींना धन्यवाद दिले.




### मागण्यांचा विचार व्हावा

नविन सार्वजनिक ग्रंथालयांना मान्यता देणे, बारा वर्षांपासून थांबलेला दर्जा बदल पुर्ववत करणे, अनुदानात वाढ करणे, ग्रंथालय कर्मचा-यांना चरितार्थ चालविण्याइतपत पगार देणे, त्यांना वेतनश्रेणी देणे, या मागण्यांचा सरकारने सहानुभूतीपुर्वक विचार करावा.

**नामदेव गरड**
ज्येष्ठ विश्वस्त, जिल्हा संघ

### सरकार उदासिन

ग्रंथालयांच्या माध्यमातून शिक्षण आणि ज्ञानाची गंगा घरोघरी पोहचली आहे. सन २०१२ पासून आजपर्यंत राज्यात एकाही ग्रंथालयास परवाणगी देण्यात आलेली नाही. कर्मचाऱ्यांना त्यांचा चरितार्थ चालविण्यायोग्य वेतन मिळत नाही. राज्य सरकार ग्रंथालयांच्या बाबतीत अतिशय उदासीन आहे.

**आ.एकनाथ खडसे**
विधान परीषद सदस्य

### ग्रंथ हेच गुरू

राज्यात ग्रंथालयांना बारा वर्षांनंतर परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. वाचन संस्कृती नष्ट होऊ नये यासाठी ग्रंथालयांसाठी अनुदान देण्यात यावे. सध्या सर्वजण गुगलवरून ज्ञान मिळवत आहोत. यामुळे ग्रंथालयांना कमी महत्व दिले जात असून ही अतिशय गंभीर बाब आहे. ग्रंथ हेच गुरू आहे. गुगलवरून आपल्याला माहिती मिळेल पण हे खरं ज्ञान ग्रंथालयांतूनच मिळते.

### आमदारांच्या अभिनंदनाचा ठराव

ग्रंथालये व त्यांच्या समस्यांवर चर्चा घडवून आणत त्या दुर करण्यासाठी विधायक सुचना केल्याबददल जिल्हा संघाच्या वतीने एकनाथ खडसे, अभिजित वंजारी, अरूण लाड,सचिन आहिर, ज. मो. अभ्यंकर यांच्या अभिनंदानाचा ठराव जिल्हा संघाच्या बैठकीत करण्यात आल्याचे संभाजी पवार यांनी सांगितले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com